scholership letter


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

संकेतस्थळ : www.mcaer.org

फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४३१७/ 386/ 2019

दि. 06 फेब्रुवारी,२०१९

## परिपत्रक

**विषय:- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत ऑनलाईन अर्ज भरून घेणे व पडताळणी करणेबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा दि. २९/१/२०१९ पासून महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

यास्तव राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयातील लिपिक व प्राचार्य यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांची काटेकोरपणे पडताळणी करून ऑनलाईन पध्दतीने प्राचार्य लॉगइनमधून विद्यापीठस्तरावरील विभागीय अधिकाऱ्यांच्या (RO) लॉगइनला तात्काळ पाठविण्यात यावेत.

तसेच राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये याकामी नियुक्त असलेल्या विभागीय अधिकाऱ्यांना (RO) सूचित करण्यात येते की, त्यांनी www.mahadbtmahait.gov.in हया पोर्टलवर आपले लॉगइनमध्ये महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या अर्जांची ऑनलाईन पध्दतीने पडताळणी करून आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे (DDO) लॉगइनला पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज त्वरीत पाठविण्यात यावेत. यास सर्वप्रथम प्राधान्य देऊन सदर प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्यात यावी.

(शेखर गायकवाड)
महासंचालक

प्रति,

**राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.**
**चारही कृषी विद्यापीठांचे विभागीय अधिकारी.**

प्रत:-

१. मे. जे. डीन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९ यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.
२. सहसचिव (कृषी विद्यापीठे), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. सहायक संचालक (लेखा-१), कृषी आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे.